**प्रेसनोट** **दिनांक २१/०३/२०१९.**

**विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**विश्रामबाग पोलीस स्टेशनकडील गुन्हयातील पाहिजे आरोपी जेरबंद.**

दि.२०/०३/२०१९ रोजी विश्रामबाग पोलीस स्टेशनचे तपास पथकातील पोलीस शिपाई ९१५१ पवार हे पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध घेत असतांना मिळालेल्या गुप्त बातमीवरुन विश्रामबाग पोलीस स्टेशन गु.र.नं.१२९/२०१८,भा.द.वि.सं.कलम १४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६,५०७ तसेच फौजदारी कायदा सुधारणा अधिनियम कलम ७, आर्म ॲक्ट ४(२५) या गुन्हयातील पाहिजे आरोपी गणेश हनुमंत भिसे,वय-२२ वर्षे,रा.३३० मंगळवार पेठ,पुणे हा पाषाणकर शो-रुम,शिवाजीनगर,पुणे येथे येणार असलेबाबत खात्रीशिर माहिती मिळाल्याने इकडील पोलीस स्टेशनचे तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक श्री परगेवार, पोहवा ३९९ काळे, पोलीस नाईक ३५३३ कामतकर, पोलीस शिपाई ९१५१ पवार यांनी सदर परिसरात सापळा लावून बातमीची खातरजमा करुन वरील गुन्हयातील पाहिजे आरोपी गणेश हनुमंत भिसे यास ताब्यात घेवून त्याचेविरुध्द योग्य ती कायदेशिर कारवाई करुन उत्तम कामगिरी पार पाडलेली आहे.

( एस.पी.कलगुटकर )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.